# व्हावी पुस्तकांशी मैत्री...

ज्ञान, मनोरंजन आणि माहिती या तीन गोष्टी मिळवण्याचे माध्यम एकच असणे म्हणजे पुस्तक होय. पुस्तकाबरोबरची मैत्री जगातील सर्वांत महत्त्वाची आणि खऱ्या अर्थाने निरपेक्ष स्वरूपाची असते. पुस्तकांबरोबरचा संवाद खरेतर एकतर्फी असतो असा समज असतो. आपण पुस्तक वाचत असतो आणि त्या पुस्तकामधून आपल्याला अनेक गोष्टी मिळत असतात. या संवादामध्ये प्रत्यक्ष माणूस समोर नसतो, पण पुस्तकाच्या रूपातून जे विश्व आपल्यासमोर उभे राहते त्याच्यात आपण हरवून जातो. एका अर्थी हा संवाद असतोही आणि नसतोही. आपण काय ग्रहण करतोय यावर हा संवाद अवलंबून असतो. काही शतकांपासून, म्हणजे थोडक्यात मुद्रणकलेच्या शोधापासून पुस्तके आपल्या जीवनात महत्त्वाचे स्थान मिळवणारी ठरली. त्यापूर्वी हस्तलिखित ग्रंथ आणि त्याही पूर्वी भूर्जपत्रांवर केलेल्या नोंदी हे पुस्तकांचे ज्ञात असलेले रूप. आपल्याबरोबर कुठेही सहजपणे बाळगता येईल असे पुस्तकांचे स्वरूप मुद्रणकलेच्या शोधानंतर पक्के झाले. पुस्तके मनुष्याच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवतात यात शंका नाही. पुस्तकांमधून मिळणारे ज्ञान, माहिती आणि मनोरंजन या वेगवेगळ्या गोष्टी आहेत. मात्र तीनही घटकांमध्ये अस्सलता हा समान धागा आहे. संगणकाच्या युगात पुस्तकांचे स्वरूप बदलले, म्हणजे संगणकाच्या मदतीने पुस्तकाचे वाचन सुरू झाले. माहितीच्या विस्फोटाच्या सध्याच्या काळात टिकून राहिलेली गोष्ट म्हणजे पुस्तक होय.

बदल हा निसर्गाचा अविभाज्य भाग असला, तरी पुस्तकांच्या बाबतीत एक गोष्ट कायम राहिली, ती म्हणजे पुस्तक आणि वाचकाचे नाते. मानवाला प्रेरणा, शक्ती आणि त्यांच्या विचारांना दिशा देण्याचे काम पुस्तकांनी नेहमीच केले. पुस्तके ही प्रत्येक माणसाच्या आयुष्यात महत्त्वाचे स्थान मिळवणारी वस्तू आहेत. कथा, कादंबऱ्या, नाटक म्हणजेच पुस्तक किंवा अवांतर वाचन करणे म्हणजेच पुस्तकांशी मैत्री असा सरसकट विचार असतो. मात्र वस्तुस्थिती तशी नाही. शिकताना किंवा एखादा समान संदर्भ शोधताना आपण पुस्तकाचीच मदत घेत असतो. मागील पिढीचा इतिहास शोधताना आपल्याला पुस्तकांची मदत होत असते. अन्न, वस्त्र, निवारा या माणसाच्या मूलभूत तीन गरजा आहेत, पण या तीन गरजांनंतरची महत्त्वाची गरज आणि माणसाच्या जीवनाला अर्थ प्राप्त करून देणारी बाब म्हणजे पुस्तके होय. ग्रंथ, पोथी, किंडल आवृत्ती अशी पुस्तकांची विविध रूपे आहेत. पुस्तकाची साथ अशा विविध रूपांनी आपल्याला आयुष्यभर होत असते. अक्षरांमधून साकारते ते पुस्तक आणि पुस्तकातून आकाराला येते ते आयुष्य इतका पुस्तक आणि माणसाच्या सहजीवनाचा साधा सोपा प्रवास आहे.

पुस्तक दिन साजरा करायचा तो पुस्तक संस्कृतीचे स्मरण म्हणून साजरा करायचा असतो. रोजच्या आयुष्यात पुस्तकांचे स्थान अनन्यसाधारण आहे. हे स्थान बळकट करण्यासाठी आणि पुस्तकांबरोबरची मैत्री अधिक दृढ करण्यासाठी पुस्तक दिनाचा हा सोहळा करायचा असतो. हा पुस्तकांचा सोहळा नसून आपल्यातील सुसंस्कृतपणा अधिक भक्कम करण्याचा उत्सव असतो. त्यामुळेच कल्याणकारी राज्य व्यवस्थेत पुस्तकांना महत्त्व असते. ग्रंथालय चळवळ उभी राहण्यासाठी तसेच वाचनालये उभी राहण्यासाठी शासन प्रयत्न करत असते. महाराष्ट्रात तर ग्रंथप्रसार आणि ग्रंथांचा संग्रह याची मोठी परंपरा आहे. अनेक लोक आपलं उभं आयुष्य या कामासाठी अर्पण करून ग्रंथालय उभे करत असतात. पुण्यातील प्रदीप लोखंडे या गृहस्थाने राज्याच्या ग्रामीण भागात विविध उपक्रमांच्या माध्यमातून, लोकसहभागातून वाचनालये उभी केली. बदलापूर येथील शाम जोशी यांनी असेच मोठे वाचनालय उभे केले. नाशिकच्या विनायक रानडे यांनी अशीच लोकसहभागातून ग्रंथभेटीची चळवळ उभी केली. पुस्तके आता ऑडिओबुकच्या स्वरूपातही आली आहेत. तसेच अनेक ठिकाणी पुस्तक वाचनाचे सामूहिक उपक्रम राबवले जात असून मोबाईलच्या वाढत्या वापरामुळे वैतागलेली तरुणाई या उपक्रमांना चांगला प्रतिसाद देत आहे. असे उपक्रम ही पुस्तकभक्तीच आहे. मनुष्याच्या सुखी आयुष्याची ती एक गरजच आहे.

वारकऱ्यांचे विठ्ठलाबरोबरचे जे नाते असते, तसे पुस्तक आणि वाचकांचे नाते आहे. त्याची नेमकी किंवा एकसाचीय अशी व्याख्या नाही, पण या नात्याची विलोभनीय रूपे आहेत, हे नक्की. पुस्तके आयुष्याला कलाटणी देतात तशीच समाजात क्रांतीही करू शकतात. त्यामुळेच पुस्तकांचे वर्णन करताना शब्द अपुरे पडतात. पुस्तक हे आपल्या आयुष्यातील चिरंजीवी व्यक्तिरेखा आहे हे विसरून चालणार नाही. पुस्तकामधून क्रांती घडवता येते तसेच सुराज्याची संकल्पना रुजवता येते. राज्यघटना हे तसे पाहायला गेले तर पुस्तकाचे रूपच होय पण आज साऱ्या राष्ट्राला बांधून ठेवणारी सर्वोच्च आदराची ती बाब आहे. तुम्ही पुस्तकाकडे कसे पाहता यावरही त्याचे स्थान अवलंबून आहे. पुस्तकाशिवाय जीवन ही कल्पनाच करता येणार नाही. यातच पुस्तकांचे महत्त्व लक्षात यावे.